तात्काळ.

जा.क्र.प्रा/प्राशि/मान्यता/पीआर,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे.१. यांचे कार्यालय,
दिनांक :- १६ ऑगष्ट, १९८४.

14 DEC 1984

प्रति

शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे-१
(प्राथ.)

विषय :- सन १९८४-८५ या शैक्षणिक वर्षात [जून, १९८४ पासून] खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.
इंग्रजी/मराठी-माध्यम-कायम विना अनुदान तत्वावर.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवायोजन विभाग, मुंबई-३२ यांचेकडील जा.क्र. पिएसएस-१०८४/(१०२४) प्राशि-३ दि. २८-११-८४ चे पत्र

उपरोक्त विषयासंबंधीचे शासनाकडील या कार्यालयास उद्देशून लिहिलेले व आपणांस पृष्ठांकित केलेले संदर्भित पत्र कृपया पहावे.

२/- या बाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदील अपवाद करुन खालील नमूद केलेल्या संस्थाना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९८४ पासून कायम विना अनुदान तत्वावर शासनाकडील संदर्भित पत्रानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | सुरु असलेले वर्ग | माध्यम. |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १) | प्रेरणा वनिता मंडळ अप्पाकुर - १८ नित्यानंद सोसायटी धनकवडी ता. हवेली जि. पुणे. | प्राथमिक शाळा नित्यानंद सोसायटी धनकवडी ता. हवेली जि. पुणे. | पहिली | मराठी |

२/-        याबाबत आपणांस कळविण्यात येते की, प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन संबंधित प्रत्येक प्राथमिक शाळेसंबंधीचा वेगवेगळा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदली आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे व संस्था सदरची शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे.

स्वाक्षरीवर शि.उ.सं. यांची सही असे

[signature]

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे. १. करिता

गेडाम/*

प्रत :- प्रशासनाधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका, शिक्षण मंडळ, पुणे जिल्हा. पुणे यांना माहितीसाठी.

प्रत :- मा. अध्यक्ष, प्रेरणा महिला मंडळ [illegible] नित्यानंद सोसायटी धनकवडी ता. हवेली जिल्हा- पुणे.

प्रत :- मा. उपसचिव/सहाय्यक सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२ यांना त्यांचेकडील संदर्भित पत्रानुसार माहितीसाठी सविनय सादर.